(243)

## को.वि.जिल्हादंडाधिकारी, नागपूर यांचे कार्यालय

मामला कमांक 41 / 2011

Application No. 2198/13
Certified Copy of आदेश
Case No. 41/2011

अर्जदार : स्टेट बॅक ऑफ पटियाला, नागपूर

विरूध्द

गैरअर्जदार : श्री.होमराज मेघराज हिरनवार, नागपूर

**दि सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्टक्शन ऑफ फायनान्सीअल ॲसेट्स ॲण्ड इन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंट्रेस्ट ॲक्ट 2002 चे कलम 14 अंतर्गत**

**( आदेश पारित दिनांक 22 / 10 / 2013 )**

प्राधिकृत अधिकारी, स्टेट बॅक ऑफ पटियाला, नागपूर यांनी दि सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्सीअल ॲसेटस ॲण्ड इन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंट्रेस्ट ॲक्ट 2002 चे कलम 14 अंतर्गत मामला दाखल करून गैरअर्जदार श्री.होमराज मेघराज हिरनवार यांनी गहाण केलेल्या मालमत्तेचा ताबा मिळण्यासाठी विनती केलेली आहे. त्यानुसार प्रकरण या कार्यालयात पंजीबध्द करण्यात आले.

प्राधिकृत अधिकारी, स्टेट बॅक ऑफ पटियाला, नागपूर यांनी दाखल केलेल्या अर्जानुसार, अर्जदार, स्टेट बॅक ऑफ पटियाला, नागपूर यांनी मे.कासलीवाल ट्रेडिंग कंपनी प्रा.लि. मार्फत संचालक श्री.संजय कालुराम जैन व श्रीमती संगीता संजय जैन यांना व्यवसाय करण्यासाठी ऋण सुविधा मंजूर केली त्याकरीता गैरअर्जदार श्री.होमराज मेघराज हिरनवार यांचे मालकीची स्थावर मालमत्ता गहाण करून सदर ऋण सुविधा अर्जदार स्टेट बॅक ऑफ पटियाला नागपूर यांनी सुरक्षीत केलेली आहे. गैरअर्जदार यांनी खालील वर्णनाची स्थावर मालमत्ता अर्जदार स्टेट बॅक ऑफ पटियाला, नागपूर यांना गहाण करून दिलेली आहे.

**–: मालमत्तेचे वर्णन :–**

मौजा–वाडी, खसरा नंबर 237 / 1, 239 / 2, वार्ड नंबर 5, ग्रामपंचायत घर नंबर 4776, प्लॉट नंबर 35 व त्यावर बांधलेले घर, तहसिल नागपूर (ग्रा.), जिल्हा नागपूर याची चर्तुःसिमा खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| पुर्वेस | : | रोड |
| पश्चिमेस | : | रोड |
| उत्तरेस | : | प्लॉट नंबर 34 |
| दक्षिणेस | : | प्लॉट नंबर 35अ |

OFFICE OF THE COLLECTOR NAGPUR

जिल्हा दंडाधिकारी, नागपूर

वरिलप्रमाणे वर्णनाची व नागपूर जिल्हयात असलेली स्थावर मालमत्ता उक्त कायदयातील तरतुदीनुसार सुरक्षित स्थावर मालमत्ता असून गैरअर्जदार कर्जाच्या व त्यावरील व्याजांच्या रक्कमेची अर्जदार स्टेट बँक ऑफ पटियाला, नागपूर यांना परतफेड करण्यास विफल झाल्यामुळे, गैरअर्जदार यांनी तारण करून ठवेलेल्या उक्त स्थावर मालमत्तेचा ताबा मिळण्यासाठी अर्जदार बँकेनी विनंती केलेली आहे.

अर्जदार बँकेने दि सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्सीअल ॲसेट्स ॲण्ड इन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंट्रेस्ट ॲक्ट 2002 चे कलम 13(2) अंतर्गत गैरअर्जदार यांना दिनांक 14/09/2009 रोजी "मागणी नोटीस" पाठवून थकीत कर्जाची व त्यावरील व्याजाची रक्कम 60 दिवसाचे आंत भरण्याची ताकीद दिलेली आहे. परंतू सदर नोटीस गैरअर्जदार यांना तामील न होता अर्जदार बँकेला परत आलेला आहे. त्यामुळे अर्जदार बँक यांनी सदर नोटीस दिनांक 31/10/2009 रोजीचे स्थानिक दैनिक **"लोकसत्ता"** व **"इंडियन एक्सप्रेस"** या दोन्ही वर्तमानपत्रात "इंग्रजी" या भाषेमध्येच प्रसिध्द केलेला आहे.

प्राधिकृत अधिकारी, स्टेट बँक ऑफ पटियाला, नागपूर यांनी दि सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्सीअल ॲसेट्स ॲण्ड इन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंट्रेस्ट ॲक्ट 2002 चे कलम 14 अंतर्गत दिनांक 23/11/2011 रोजी या कार्यालयात मामला दाखल केला. त्यानुषंगाने अर्जदार व गैरअर्जदार यांना या प्राधिकरणाद्वारे दिनांक 31/12/2011 अन्वये सुचनापत्र पाठवून मामल्याचे अनुषंगाने म्हणने दाखल करण्याची संधी देण्यात आली. गैरअर्जदार स्वतः व त्यांचे मार्फत वकील हजर झाले. त्यांना मामल्याचे अनुषंगाने उत्तर दाखल करण्यासाठी या प्राधिकरणाद्वारे पुरेशा संधी देण्यात आलेल्या आहेत. परंतू गैरअर्जदार यांनी स्वतः किंवा त्यांचे वकील यांनी मामल्याचे अनुषंगाने उत्तर दाखल केलेले नाही. तसेच ते अंतिम सुनावणीचे दिवशी या प्राधिकरणासमक्ष प्रत्यक्ष हजर झालेले नाही. परंतू त्यांनी दिनांक 30/09/2013 रोजी खालील प्रमाणे उत्तर दाखल केलेले आहे.

"अर्जदार बँक यांनी गैरअर्जदार यांना पाठविलेला कलम 13(2) अंतर्गतचा मागणी नोटीस गैरअर्जदार यांना तामील न होता Not Claimed नमूद करून अर्जदार बँकेला परत गेलेला आहे. मुंबई उच्च न्यायालयाने लक्ष्मी विरूध्द भिमराव या प्रकरणात अशाप्रकारच्या तामीलीला अमान्य केलेले आहे. अर्जदार बँकेने मागणी नोटीशीची प्रत गैरअर्जदार वास्तव्य करित

असलेल्या जागेवर चस्पा केलेला नाही, तसेच सदर नोटीस दोन प्रमुख स्थानिक वर्तमानपत्रात त्यापैकी एक स्थानिय भाषेमध्ये प्रसिध्द केलेला नाही. अर्जदार बॅंकेने पझेशन नोटीस वर्तमानपत्रात प्रसिध्द केलेला आहे, परंतू वास्तवीक प्रतिकात्मक ताबा घेतलेला नाही. अर्जदार बॅंकेने गैरअर्जदार यांना पझेशन नोटीस पाठविलेला किंवा सदर नोटीस गैरअर्जदार यांचे मालमत्तेच्या बाहेरील भागावर लावून चस्पा सुध्दा केलेला नाही."

अर्जदार बॅंकेचे वकील अंतीम सुनावणीचे दिवशी हजर झाले. त्यांनी या प्राधिकरणाला विनंती केली की, अर्जदार बॅंकेने गैरअर्जदार यांना कलम 13(2) अंतर्गत पाठविलेला "मागणी नोटीस" तामील झाला नसल्यामुळे सदर नोटीस दिनांक 31/10/2009 रोजीचे स्थानिक दैनिक **"लोकसत्ता" व "इंडियन एक्सप्रेस"** या दोन्ही वर्तमानपत्रात "इंग्रजी" या भाषेमध्ये प्रसिध्द करून नोटीशीची बजावणी करण्यात आलेली आहे. गैरअर्जदार यांना त्यांचे कर्ज खाते नियमित करण्यासाठी तसेच कर्जाच्या संपुर्ण रक्कमेची परतफेड करण्यासाठी पुरेशा संधी दिलेल्या आहेत. परंतू गैरअर्जदार कर्जाची रक्कम पुर्णतः परतफेड करण्यासाठी विफल झालेले आहेत, म्हणून गैरअर्जदार यांनी गहाण करून ठेवलेल्या मालमत्तेचा प्रत्यक्षात ताबा घेण्याचा अर्जदार बॅंकेला कायदयानुसार पुर्ण हक्क आहे. सदर प्राधिकरणाला अर्जदार बॅंकेचा अर्ज मंजूर करण्याकरीता कोणतीही कायदेशीर अडचन उद्‌भवत नसून अर्जदार बॅंकेचा अर्ज मंजूर करावा अशी विनंती केलेली आहे.

उक्त कायदयाचे नियम 3 नुसार 'मागणी नोटीस' अन्य कोणत्याही कारणाने बजावणी करण्यात येऊ शकत नसेल त्याबाबतीत, जेथे ऋणको किंवा त्याचा (एजंट) सर्वसाधारणपणे राहत असेल किंवा वैयक्तिक लाभासाठी काम करीत असेल, त्या घराच्या किंवा इमारतीच्या बाहय दरवाज्यावर किंवा त्याच्या अन्य काही ठळक जागेवर मागणी नोटीशीची प्रत लावून आणि दोन पेक्षा जास्त वृत्तपत्रांमध्ये त्यापैकी एक त्या ठिकाणी मोठया प्रमाणात प्रसारित होणाऱ्या स्थानिय भाषेतील वृत्तपत्रामध्ये मागणी नोटीशीचा मजकूर प्रसिध्द करून त्याद्वारे बजावणी करण्यात येईल अशी तरतूद आहे.

परंतू अर्जदार बॅंकेने दाखल केलेल्या अर्जासोबत सादर केलेल्या दस्तावेजांचे अवलोकनांती अर्जदार बॅंकेने गैरअर्जदार यांना दिनांक 14/09/2009 रोजी पाठविलेल्या मागणी नोटीशची बजावणी झाल्याबाबत गैरअर्जदार यांची स्वाक्षरी असलेली पोचपावती मामल्यासोबत सादर केलेली नाही. सदर नोटीशीची प्रत गैरअर्जदार वास्तव्य करित असलेल्या घराच्या किंवा

इमारतीच्या बाहय दरवाज्यावर किंवा त्यांच्या अन्य काही ठळक जागेवर लावून चस्पा केल्याबाबतचा पुरावा मामल्यासोबत सलंग्न केलेला नाही. तसेच मागणी नोटीशीचा मजकूर त्या ठिकाणी मोठया प्रमाणात प्रसारित होणाऱ्या स्थानिय भाषेतील वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द केल्याबाबतचा पुरावा मामल्यासोबत सादर केलेला नाही. उक्त कायदयाचे कलम 14 अंतर्गत मामला दाखल करण्यापुर्वी अर्जदार बॅंक यांनी नियम 3 नुसार गैरअर्जदार यांना मागणी नोटीशीची बजावणी करणे आवश्यक आहे. प्राधिकृत अधिकारी यांनी मामल्यासोबत सादर केलेल्या दस्तावेजांचे अवलोकनाअंती असे निदर्शनास येते की, अर्जदार बॅंकेने नियम 3 नुसार गैरअर्जदार यांना मागणी नोटीशीची बजावणी केलेली नाही.

त्याअर्थी, मी सौरभ राव, जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, नागपूर, दि सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्सीअल ॲसेट्स ॲण्ड इन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंट्रेस्ट ॲक्ट 2002 चे कलम 14 अंतर्गत मला असलेल्या अधिकाराचा वापर करून खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

प्राधिकृत अधिकारी, स्टेट बॅंक ऑफ पटियाला, नागपूर यांनी दाखल केलेला अर्ज वरिल कारणाचे आधारे नामंजूर करून प्रकरण यास्तरावर नस्तीबध्द करण्यात येत आहे.

सबब सदर्हू आदेश माझे सही व शिक्क्यानिशी आज दिनांक 22/10/2013 रोजी पारित करण्यात आला.

(मा.जिल्हादंडाधिकारी द्वारा अनुमोदीत)

स्वा/-
( सौरभ राव )
जिल्हादंडाधिकारी, नागपूर

TRUE COPY
Head Copyist
Collectorate Nagpur

क.गृह/अजिदं/प्रस्तु/प्र.क. 41/11/कावि 473/2013
जिल्हादंडाधिकारी नागपूर यांचे कार्यालय,
नागपूर दिनांक 28/10/2013

प्रत,

1)प्राधिकृत अधिकारी, स्टेट बॅंक ऑफ पटियाला, 2 सि.ए.रोड शाखा, नागपूर यांना माहिती व कार्यवाहीस्तव अग्रेषित.

2)श्री.होमराज मेघराज हिरनवार, रा.गोकुलपेठ, लक्ष्मीनगर ते रामनगर रोड, नागपूर यांना माहितीस अग्रेषित.

24/10/13

28 10 2013
जिल्हादंडाधिकारी, नागपूर करिता

Date of Application 11/11/13
Told to appear on 11/11/13
Date of appearance 11/11/13
Copy ready on 11/11/13
Copy delivered on 11/11/13
Cost of Copy 11/11/13
O/C

Compared by Head Copyist
Collectorate Nagpur

Received Rs. 30/- (in Words Rupees Thirty Rs) as fee for this certified copy.
11/11/13 Head Copyist
Collectorate Nagpur